# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ३३६/२०२३/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. हरेश्वर सारंगधर साळवे,<br>रा. हरणी निवास, स्टेशन रोड,<br>नाका नं-५, पिंपळाचा मळा रोड,<br>मुलनमाथा, ता.राहुरी,जि.अहदनगर. | सहायक आयुक्त,<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यलय, अभिविश्र्व कॉम्प्लेक्स, बोल्हेगांव फाटा, एम.आय.डी.सी. अहमदनगर, ता.जि. अहमदनगर. | प्रादेशिक उपायुक्त,<br>समाज कल्याण नाशिक विभाग, नाशिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नासर्डी पुलाजवळ, पुणे रोड, नाशिक, ता. जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक — २०/०६/२०२४**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित |

२. **व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २२/०७/२०२१

(२) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : दिशाभूल करणारी व खोटी माहिती सादर केली., माहिती लपविण्याचा प्रयत्न केला व फार मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्या कारणाने.

(३) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : दंडात्मक कार्यवाही होऊन माहिती देण्याचे आदेश व्हावेत.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १०/०९/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १०/०९/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१९-२० ते आज अखेर

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

सदगुरु रोहिदासजी बहुउद्देशिय ग्रामीण विकास प्रतिष्ठाण अहमदनगर या संस्थेला केंद्र शासनाचे अनुदान मिळणेकामी संस्थेने आपल्या कार्यालयास ऑनलाईन सादर केलेल्या सदगुरु रोहिदासजी अनु. जाती केंद्रिय माध्यमिक हॉस्टेल खंडगांव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर या युनिटचे सर्व प्रस्तावात दिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती (staff statement) खालील फॉर्मटमध्ये संस्थेकडून आपणांमार्फत पेजिंग व साक्षांकित करुन मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २१/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती सदगुरु रोहीदासजी बहुउद्देशिय ग्रामीण विकास प्रतिष्ठाण अहमदनगर संचलित चालविल्या जाणाऱ्या युनिट/प्रकल्प संस्थेने ministry of social justice and Empowerment सादर या वेबसाईटवर केंद्रिय अनुदान मिळणेबाबतचे प्रस्ताव अद्याप ऑनलाईन सादर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे माहिती देता येत नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१२/९८९/प्रक्र४७९/सहा मंत्रालय मुंबई ३२ दि. १७/१०/२०१४ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार मुद्दा क्रमांक ३ नुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कमल ८ पोटकलम (त्र) मधील तरतुदीनुसार जी

माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यांवर नाही अशी आणि लोकहीताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: तह त्रयस्थ पक्षाबरोबर उदभवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागविलेली माहिती माहितीच्या अधिकारात अर्जदारास देण्यात येऊ नये. असे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच सदर संस्थेच्या विरुध्द मा. जिल्हा सत्र न्यायालय अहमदनगर येथे आर्थिक फसवणुकीच्या २० गुन्हे दाखल असून त्याची सुनावणी प्रलंबित आहे. न्यायप्रविष्ट प्रकरण असल्यामुळे व आपण फिर्यादी असल्यामुळे आपणास मागणी केलेली वरील माहिती नाकारण्यात येत आहे. अशी वस्तुस्थिती कळविलेली आहे.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०३/१०/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३/१०/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती दिलेली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०१/११/२०२२ रोजी आदेश पारीत केल्याचे दिसून येते. त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर यांनी कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती आहे त्या स्वरुपात (जशी आहे तशी) अर्जदारा यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. सदर निर्णयाची अंमलबजावणी सदर आदेश मिळाल्यानंतर १५ दिवसाच्या आत करण्यात यावी. असे आदेशित करुन प्रथम अपिल अर्ज निकाली काढले आहे.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** — सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागणी केल्याप्रमाणे माहिती पुरविलेली आहे, असे सांगितले. अपिलार्थी यांनी माहिती दिलेली आहे, तथापि प्रमाणित करुन दिलेली नाही असे सांगितले. कर्मचारी मानधन व विद्यार्थी पोषण याबाबत केंद्र शासनाकडून अनुदान संस्थेला परस्पर मिळाले. प्रथम अपिल निर्णयानुसार माहिती मिळाली. परंतु चुकीची माहिती मिळाली, असे अपिलार्थी यांनी स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष** —

- अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. २१/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती पुरविलेली आहे.
- तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नाशिक यांनी प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येते.
- अपिलार्थी यांनी असे नमूद केलेले आहे की, माहिती दिली परंतु सत्यप्रत करुन दिलेली नाही.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त समाज कल्याण, अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०/०९/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती सत्यप्रत करुन नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक ३३६/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. 2008 12 MAR 2025